DAY — 08　　SEAT NUMBER

| 2023 | III | 01 | 1500 | J-257 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# POLITICAL SCIENCE (42)

Time : 3 Hrs.　　(4 Pages)　　Max. Marks : 80

*सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*
*(२) उजवीकडे दिलेल्या संख्या पूर्ण गुण दर्शवितात.*
*(३) प्रत्येक नव्या प्रश्नाच्या उत्तराचा प्रारंभ नवीन पानावर करावा.*

प्र. १. (अ) कंसातील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : (५)[२०]

(१) सोव्हिएट रशियाचे विघटन -------- या वर्षी झाले.
(१९९१, १९८९, १९९८, २०००)

(२) परदेशी चॅनल भारतात येईपर्यंत ------ हेच एकमेव दूरचित्रवाणीचे माध्यम होते.
(सोनी, झी, दूरदर्शन, स्टार)

(३) २०११ च्या जनगणनेनुसार भारतीय महिलांचे साक्षरतेचे प्रमाण ------ टक्के आहे.
(६५.४६, ७०, ४४.५०, ५८)

(४) संरमजामशाहीच्या विरोधात १९६७ मध्ये ------- मधील नक्षलबारी येथे आंदोलन करण्यात आले.
(गोवा, प. बंगाल, बिहार, केरळ)

(५) १९७१ च्या भारत पाकिस्तान युद्धानंतर ------- देशाची निर्मिती झाली.
(बांग्लादेश, श्रीलंका, इंडोनेशिया, म्यानमार)

(ब) खालीलपैकी प्रत्येक गटांतील चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा : (३)

(१) (अ) एरिट्रीया — इथियोपियापासून स्वातंत्र्य
(ब) पूर्व तिमोर — इंडोनेशियापासून स्वातंत्र्य
(क) चेचन्या — ब्रिटनपासून स्वातंत्र्य हवे



Previous Pathshala

(२) (अ) आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबतचे नियम — (GATT-1948)
(ब) जागतिक व्यापार संघटना (WTO) — २०००
(क) जागतिकीकरण — १९९१

(३) (अ) नीती आयोग — २०१५
(ब) आर्थिक सुधारणांच्या कार्यक्रमाची सुरुवात — १९९१
(क) महिला सक्षमीकरण धोरण — २०१८

(क) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : (४)

(१) शीत युद्धोत्तर काळात अमेरिकेने जागतिक व्यवस्थेवर अधिपत्य गाजविण्यास सुरुवात केली, कारण .......
(अ) आर्थिक क्षेत्रात बऱ्याच देशांनी समाजवादी अर्थव्यवस्थेचा त्याग केला.
(ब) युगोस्लोव्हियाचे विघटन होऊन नवीन राष्ट्रे उदयास आली.
(क) अमेरिकेच्या लष्करी आणि आर्थिक ताकदीला कोणीही आव्हान देऊ शकत नव्हते.

(२) भारत हे एक विकसनशील राष्ट्र आहे, कारण .....
(अ) भारत खनिजतेलाच्या बाबतीत समृद्ध आहे.
(ब) भारताला विकास साधण्यासाठी उद्योगक्षेत्रांमध्ये आर्थिक गुंतवणुकीची गरज आहे.
(क) भारतात लोकसंख्या जास्त आहे.

(३) १९९० साली भारताने आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडून कर्ज घेतले, कारण....
(अ) महागाई वाढ होऊन सार्वत्रिक रोष निर्माण झाला.
(ब) जलद औद्योगिकीकरण करण्यासाठी.
(क) १९८० च्या दशकात भारताला आर्थिक संकटांना सामोरे जावे लागले.

(४) स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत-पाक या दोन देशांत सातत्याने वाद सुरू आहे, कारण ......
(अ) जम्मू-काश्मीरचा प्रश्न.
(ब) ब्रम्हपुत्रेच्या पाणी वाटपाचा प्रश्न.
(क) तिबेटचा प्रश्न.

(ड) दिलेल्या विधानासाठी समर्पक संकल्पना लिहा : (४)
(१) जेव्हा एक राज्य इतर राज्यांवर लष्करी ताकदीच्या वापराशिवाय प्रभाव पाडते.
(२) अनेक देशांत कार्यरत असलेली कंपनी.
(३) जास्त उत्पन्न देणाऱ्या जातीच्या बियाणांचा विकास, सिंचन पद्धतीचा विस्तार.
(४) लोकांचा राज्याच्या निर्णय प्रक्रियेतील सहभाग.


Previous Pathshala

(इ) गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा : (४)


(१) ब्रिक्सचे सदस्य - भारत, रशिया, चीन, अमेरिका.

(२) पेटंट, ट्रेडमार्क, कॉपीराईट, शिक्षण.


(३) भाषावाद, प्रांतवाद, राष्ट्रवाद, जमातवाद.

(४) अरुणाचल प्रदेश, सिक्किम, दलाईलामा, मेघालय.

प्र. २. (अ) खालील संकल्पना चित्र पूर्ण करा : (४)




(ब) खालील नकाशाचे निरीक्षण करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा : (५)




(१) आशिया खंडातील कोणत्याही पाच देशांची नावे सांगा.

प्र. ३. खालील विधाने 'बरोबर' की 'चूक' ते सकारण सांगा (कोणतेही पाच) : (१०)

(१) राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना महिला हक्क संरक्षणासाठी करण्यात आली.

(२) राजकीय कार्यकारी प्रमुखाविरोधात लोकायुक्त चौकशी करू शकतात.

(३) १९८० च्या दशकाला मानवतावादी हस्तक्षेपाचा 'सुवर्णकाळ' म्हणतात.



Previous Pathshala

(४) समाज परिवर्तनासाठी व राष्ट्रीय एकात्मतेसाठी लोकशाही आवश्यक आहे.

(५) पारंपरिक प्रशासन कार्यक्षम होते.

(६) राष्ट्रीय एकात्मता परिषदेची स्थापना करण्यात आली.

(७) भारतामध्ये नियोजन आयोगाची निर्मिती कृषी विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी करण्यात आली.

**प्र. ४. खालील विधानांचा सहसंबंध स्पष्ट करा ( कोणतेही तीन ) :** [९]

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | भारत | – | बांग्लादेश |
| (२) | लोकपाल | – | भ्रष्टाचार निर्मूलन |
| (३) | भारतीय समाज | – | स्त्री पुरुष असमानता |
| (४) | मानवी हक्क | – | मानवतावादी हस्तक्षेप |
| (५) | राष्ट्रीय एकता | – | प्रादेशिक अस्मिता |

**प्र. ५. खालील विषयावर तुमचे मत २५ ते ३० शब्दांत मांडा ( कोणतेही तीन ) :** [१२]

(१) ई-प्रशासनामुळे शासकीय प्रक्रिया जलद झाली.

(२) शांतता व स्थैर्य याची राष्ट्राच्या प्रगतीसाठी गरज असते.

(३) पर्यावरण ऱ्हासामुळे अनेक समस्या निर्माण होतात.

(४) उदारमतवादी लोकशाही आवश्यक आहे.

(५) जागतिकीकरणामुळे ग्राहकांना दर्जेदार वस्तू व सेवा मिळतात.

**प्र. ६. खालील प्रश्नांची उत्तरे ८० ते १०० शब्दांत लिहा ( कोणतेही दोन ) :** [१०]

(१) भारतातील डाव्यांचा उग्रवाद म्हणजे काय?

(२) भारताच्या परराष्ट्र धोरणाची मूलभूत तत्त्वे स्पष्ट करा.

(३) महिला सक्षमीकरणासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना स्पष्ट करा.

(४) भारतात प्रशासकीय सुधारणा करण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न स्पष्ट करा.

**प्र. ७. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सुमारे १५० ते २०० शब्दांत स्पष्ट करा :** [१०]

(१) भारताच्या परराष्ट्र धोरणाला प्रभावित करणारे घटक स्पष्ट करा –

(अ) ऐतिहासिक घटक (ब) आर्थिक घटक

(क) राजकीय घटक (ड) भौगोलिक घटक

(इ) आंतरराष्ट्रीय व्यवस्था

(२) जागतिकीकरणाचे परिणाम स्पष्ट करा –

(अ) तंत्रज्ञानावरील परिणाम (ब) सामाजिक परिणाम

(क) सांस्कृतिक परिणाम (ड) राजकीय परिणाम

(इ) आर्थिक परिणाम

◆◆◆



Previous Pathshala